**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या उद्या राज्यात विविध ठिकाणी प्रचार सभा
- झारखंड विधानसभा निवडणुकीतल्या पहिल्या टप्प्यातल्या विधानसभा मतदारसंघातला प्रचार संपला
- प्रदुषणमुक्त वातावरणात जगण्याचा प्रत्येकाला अधिकार, कोणताही धर्म प्रदुषणाला प्रोत्साहन देत नसल्याचं सर्वोच्च न्यायालयाच निरीक्षण
- अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा झाल्याचं वृत्त रशियानं फेटाळलं

**आणि**

- भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदाचा ‘सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार’ ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते फिलिप नोईस यांना दिला जाणार

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उद्या राज्यात चिमुर, सोलापूर आणि पुणे इथं प्रचारसभा होणार आहेत.  केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या मुंबईतल्या दोन सभांना संबोधित करतील. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी हे चिखली आणि गोंदिया मतदारसंघातल्या काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस नेते राहुल गांधी अपप्रचार करत आहेत. त्यामुळं त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी भाजपाने आज केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली. गांधी यांनी भाजपावर राज्यघटना नष्ट करत असल्याचा खोटा आरोप करत तणाव निर्माण केल्याचं त्यांनी या तक्रारीत म्हटलं असून आयोगाने यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. गेल्या आठवड्यात मुंबईत झालेल्या सभेदरम्यान राहुल गांधी यांच्या भाषणाचा संदर्भ देऊन त्यांना आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप भाजपाने केला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते अर्जुन राम मेघवाल यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज मुख्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन ही तक्रार केली.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत शिवसेनेनं आपली ताकद दाखवून दिली असून, विधानसभा निवडणुकीत विक्रमी यश मिळवू, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथं आयोजित प्रचारसभेत बोलत होते.

**<><><><><>**

महाविकास आघाडीचा निवडणूक जाहिरनामा फसवा असून त्यावर कुणीही विश्वास ठेवणार नाही, अशी टीका भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. काँग्रेसने महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेची खिल्ली उडवली, मात्र आता ते याच योजने अंतर्गत महिलांना तीन हजार रुपये देऊ, असं आश्वासन देत आहेत असं बावनकुळे म्हणाले.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत भाजपानं ४०० हून अधिक जागा मिळवण्याचा निर्धार केला होता, तो पूर्ण झाला असता तर संविधान बदलण्याचा धोका निर्माण होऊ शकला असता, मात्र जनतेच्या जागरूकतेमुळे हे घडलं नाही, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते जळगाव इथं प्रचारसभेत बोलत होते. भारतीय घटनेच्या संरक्षणासाठी सावधान राहिलं पाहिजे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भाजपाला विधानसभा निवडणुकीत पराभव दिसू लागल्यानं ते हिंदू-मुस्लीम मुद्दा उपस्थित करत आहेत, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.  ते आज यवतमाळ जिल्ह्यातल्या सभेत बोलत होते.  जातीधर्मात फूट पाडणाऱ्या भाजपा युतीला सत्तेतून तडीपार करा, असं आवाहन पटोले यांनी केलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत मतदारांनी न चुकता आपला मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन शब्दभ्रमकार रामदास पाध्ये आणि त्यांच्या ससोबानं केलं आहे…..

**होल्ड - बाईट - रामदास पाध्ये (१५ सेकंद)**

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या पुणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचा प्रचार आज सायंकाळी संपला. या टप्प्यातील ४३ जागांसाठी बुधवारी मतदान होणार आहे. या टप्प्यात प्रचारादरम्यान दोनशेहून अधिक सभा घेण्यात आल्याचं वृत्त आमच्या वार्ताहरानं दिलं आहे. एनडीएनं बांगलादेशी घुसखोरी, हेमंत सोरेन सरकारविरोधातील भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि मासिक रोख रक्कम हस्तांतरण योजना आदी मुद्दे उपस्थित केले तर इंडीयानं केंद्राकडून झारखंडविरोधात भेदभाव, राज्याला पुरेसा निधी वाटप आणि मासिक हस्तांतरण आदी मुद्दे उपस्थित केले आहेत. दरम्यान मतदानासाठीची सर्व तयारी अंतिम टप्प्यात असून आजपासून मतदान पथकं आपापल्या मतदान केंद्रांवर रवाना करण्यात येत असल्याचं मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

११ राज्यांतल्या ३३ विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठी आणि केरळमधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी आज संध्याकाळी प्रचार संपला. राजस्थानात ७, पश्चिम बंगालमधे ६, आसाममधे ५, बिहारमधे ४, कर्नाटकात ३ आणि मध्य प्रदेश-सिक्कीममधे प्रत्येकी २ जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. केरळ, छत्तीसगड, गुजरात, मेघालय मधे प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे.

**<><><><><>**

झारखंडचे मुख्य निवडणूक अधिकारी के. रवी कुमार यांनी अवर सचिव संजय कुमार श्रीवास्तव यांना निलंबित केलं आहे. एकाच पक्षाला प्राधान्य देत असल्याच्या कारणावरुन त्यांच्यावर ही कारवाई झाली.

**<><><><><>**

आरोग्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार असून कोणताही धर्म प्रदूषणाला प्रोत्साहन देत नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. भारतीय संविधानानुसार प्रत्येक नागरिकाला प्रदूषणमुक्त वातावरणात जगण्याचा अधिकार आहे, असं न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज यांच्या द्विसदस्यीय पीठाने आज झालेल्या सुनावणीत म्हटलं.  तसंच दिवाळीच्या काळात दिल्लीत फटाक्यांवर बंदी आणण्यात अपयश का आलं अशी विचारणा प्रशासनाला करत फटाक्यांवर बंदी आणण्याबाबत तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले.

**<><><><><>**

भारत आणि रशियानं व्यापारी संबंध आणखी दृढ करण्याची गरज परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी आज व्यक्त केली. मुंबईत भारत - रशिया व्यावसायिक परिषदेला ते संबोधित करत होते. रशियाचे प्रथम उप प्रधानमंत्री डेनिस मान्टुरोव्ह यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. दोन्ही देशांमधला व्यापार सध्या ६६ अब्ज अमेरिकन डॉलर आहे. २०३० पर्यंत हा व्यापार १०० अब्ज डॉलरच्या पलीकडे जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. दळणवळण, बँकिंग आणि आर्थिक देवाण-घेवाणीच्या संदर्भातले अडथळे दूर करण्यासाठी दोन्ही देशांकडून प्रयत्न सुरू आहेत. लवकरच दोन्ही बाजूंना मान्य असलेला तोडगा निघेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात दूरध्वनीवरुन चर्चा झाल्याचं वृत्त रशियानं फेटाळलं आहे. ट्रम्प निवडणुुकीत विजयी झाल्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये दूरध्वनीद्वारे चर्चा

झाल्याचं वृत्त खोटं आणि काल्पनिक असल्याचं रशियाच्या अध्यक्षांचे प्रवक्ते देमित्री पेस्कोव्ह यांनी आज मॉस्कोमध्ये वार्ताहरांना सांगितलं.

**<><><><><>**

श्रीलंकेत सार्वत्रिक निवडणुकांचा प्रचार आज मध्यरात्री संपणार आहे. १९६ जागांसाठी ८ हजार ८०० हून अधिक उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रधानमंत्री हरिणी अमारसुरिया, माजी प्रधानमंत्री दिनेश गुनवर्धने, विरोधी पक्षातले साजिथ प्रेमदास हे प्रमुख उमेदवार रिंगणात आहेत. गुरुवारी सकाळी ७ ते संध्याकाळी ४ वाजेदरम्यान १३ हजारांहून अधिक मतदान केंद्रावर मतदान होईल. यासाठी १ कोटी ७० लाखांहून अधिक मतदारांची नोंद झाली आहे. सुमारे ७५ हजार पोलीस सुरक्षेसाठी नियुक्त आहेत.

सप्टेंबरमध्ये NPP पक्षाचे अनुरा कुमारा दिसनायके अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. त्यानंतर त्यांनी संसद बरखास्त करुन निवडणुकांचा मार्ग मोकळा केला होता.

**<><><><><>**

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदाचा सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते फिलिप नोईस यांना दिला जाणार आहे. माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. हा महोत्सव गोव्यात २० नोव्हेंबरपासून २८ नोव्हेंबरपर्यंत सुरू असेल.

तरुण चित्रपट निर्माते यांच्यावर या महोत्सवाचा भर आहे. नव्या चित्रपट निर्मात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट नवोदित भारतीय दिग्दर्शक पुरस्कार यंदापासून सुरू होणार आहे.

ऑस्ट्रेलिया या वेळेचा ‘फोकस कंट्री ऑफ द इयर’ आहे. या महोत्सवासाठी १०१ देशांतून १ हजार ६७६ प्रवेशिका आल्या होत्या. त्यापैकी ८१ देशातले १८० चित्रपट महोत्सवात दाखवले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

यंदाच्या महोत्सवात चित्रपट उद्योगाबरोबरची भागिदारी आणखी वाढवल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

बिहार इथं सुरू असलेल्या महिला हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाने मलेशियाचा ४-० असा पराभव केला. भारताच्या संगीता कुमारीच्या शेवटच्या गोलने भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.

त्याआधी जपान आणि दक्षिण कोरिया यांच्यातला उद्घाटनपर सामना २-२ असा अनिर्णित राहिला.

या स्पर्धेत भारतासह जपान दक्षिण कोरिया, थायलंड, मलेशिया आणि चीन या देशाचे संघ सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

विख्यात मृदंगवादक आणि अभ्यासक वरदराव कमलाकर राव यांचं आज सकाळी आंध्रप्रदेशातल्या राजमुंद्री इथं निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. गेल्यावर्षीच त्यांना संगीत नाटक अकादमी पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं.

**<><><><><>**

जपानमध्ये लिबरल डेमोक्रॅटिक पार्टीचे नेते शिगेरू इशिबा यांची आज जपानच्या प्रधानमंत्रीपदी पुन्हा निवड झाली आहे. प्रधानमंत्र्यांच्या निवडीसाठी जपानच्या संसदेनं विशेष अधिवेशन बोलावलं होतं.